जावक क्र.: ३९२३/१९
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय
धर्मादाय आयुक्त भवन, ३ रा मजला
८३, डॉ. ॲनी बेसंट रोड
वरळी, मुंबई - ४०० ०१८

07 AUG 2019

# परिपत्रक क्रमांक ५६१/२०१९ दिनांक ०७/०८/२०१९

पहा — मा. धर्मादाय आयुक्त यांचे परिपत्रक क्र. २८८/१९९५ दि. २.३.१९९५

असे निदर्शनास आले आहे कीं, वर नमूद परिपत्रकाची अंमलबजावणी धर्मादाय संघटनेतील कांही अधिकारी यांचेकडून होत नाही. तरी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ८३ अन्वये प्रस्ताव पाठवताना वर नमूद परिपत्रकाचे पालन करावे.

तसेच, असेही निदर्शनास आले आहे कीं, दाखल केलेल्या फौजदारी खटल्यांमध्ये, कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी हे कोर्टामध्ये नमूद असणा-या तारखेस हजर राहात नाहीत व त्यामुळे, सदरचे खटले निकाली निघतात आणि असे खटले निकाली निघाल्यामुळे, तक्रारदार/विश्वस्त हे धर्मादाय संघटनेतील अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द तक्रार दाखल करतात. करीतां, अधिकारी/कर्मचारी यांनी योग्य ती काळजी घ्यावी.

सर्व सहायक/धर्मादाय आयुक्त यांना आदेशित करण्यांत येते कीं, कलम ८३ अन्वये मंजूरी मिळालेनंतर, दाखल केलेल्या फौजदारी खटल्यांबाबतचे रजिष्टर ठेवण्यात यावे व फौजदारी प्रकरणातील प्रगतीचा त्रैमासिक अहवाल हया कार्यालयास सादर करावा.

पुढील परिणाम टाळणेकरीतां, या परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे.

(संजय ग. मेहरे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत —
१. सर्व धर्मादाय सह आयुक्त
२.सर्व धर्मादाय उप आयुक्त
३.सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
४.कार्यालय परिपत्रक धारिणी
५.संगणक शाखा (संकेतस्थळावर नोंदीसाठी)

मभिसरनोबत/०७०८२०१९